**महाराष्ट्र शासन**

क्रमांक : नाजक१०/२००६/प्र.क्र.१२६/नाजकधा १
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १४ मार्च, २००७.

प्रति

१. महानगर आयुक्त,
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
वांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व)
मुंबई ४०० ०५१.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व)
मुंबई ४०० ०५१.

**विषय :** नाजकधा अधिनियमांतर्गत अतिरिक्त ठरलेल्या जमिनीवर एस.आर.ए. योजना मंजूर करण्यापूर्वी शासनाचे ना हरकत प्रमाणपत्र घेण्याबाबत.

**संदर्भ :** महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, परिपत्रक क्र.नाजकधा- १०(२००३)/प्र.क्र.७७/नाजकधा-१, दिनांक १५/९/२००३

महोदय,

नागरी जमिन कमाल धारणा अधिनियमांतर्गत अतिरिक्त ठरलेल्या जमिनीवर गृहबांधणी योजना राबविण्यासाठी शासनाने कलम २० व २१ खालील दुर्बल घटक गृहबांधणी योजनांची घोषणा केली आहे. अशा अतिरिक्त जमिनींवर अनेक जमिनधारकांनी कलम २० व २१ खालील दुर्बल घटक गृहबांधणी योजना सादर केल्या असून शासनाने त्या मंजूरही केलेल्या आहेत. दरम्यानच्या काळात झोपडपट्टी पुनर्वसनार्थ शासनाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची स्थापना केली. सदरहू प्राधिकरणामार्फत झो.प.सु. योजना राबविण्यात येतात. अधिनियमांतर्गत अतिरिक्त ठरलेल्या अनेक जमिनींवर जमिनधारकाने अशाप्रकारच्या एस.आर.ए.योजना सादर केल्या असून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण तसेच एम.एम.आर.डी.ए.ने. त्यांना मंजूरीही दिल्याचे निदर्शनास आल्यानंतर एकाच जमिनीवर दोन योजना राबविण्यात येत असल्याने कायदेशीर अनियमितता होत असल्याची बाब सक्षम प्राधिकाऱ्यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिली. त्यावेळी याबाबींचा सांगोपांग विचार करुन शासनाने जाणीवपूर्वक निर्णय घेतला असून त्यानुसार अधिनियमांतर्गत अतिरिक्त ठरलेल्या जमिनींवर एस.आर.ए.योजना मंजूर करण्यापूर्वी संबंधित प्राधिकरणाने शासनाची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक करण्यांत आले आहे. त्यानुसार दि.१५.९.२००३

लेटर फॉरमॅट/सुसप.

रोजी परिपत्रक जारी करुन त्यामध्ये देण्यात आलेल्या सूचनांनुसार कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधित प्राधिकरणास देण्यात आल्या आहेत.

सदरहू परिपत्रक जारी करण्यात आल्यानंतर अधिनियमांतर्गत अतिरिक्त ठरलेल्या जमिनींवर एखाद्या जमिनधारकाने एस.आर.ए./एम.एम.आर.डी.ए. यांचेकडे योजना सादर केल्यास सदर जमिनीची सद्यःस्थिती विचारात घेऊन त्याबाबत शासनाची पूर्व परवानगी घेतल्यानंतरच संबंधित प्राधिकरणाने त्यावर एस.आर.ए.योजना मंजूर करणे अभिप्रेत आहे. तथापि, अनेक प्रकरणात एस.आर.ए./एम.एम.आर.डी.ए. यांचेकडून शासनाची पूर्व परवानगी न घेता शासनाच्या परवानगीच्या अधीन राहून योजना मंजूरीचे इरादापत्र जारी करण्यात येत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. ही बाब विचारात घेता शासनाच्या सूचनांचे अनुपालन केले जात नाही, असे दिसते. सदरहू बाब गंभीर स्वरुपाची आहे.

उपरोक्त विवेचन विचारात घेऊन, कोणत्याही जमिनीवर एस.आर.ए.योजना मंजूर करण्यापूर्वी संबंधित प्राधिकरणाने प्रस्तुतची जमीन नाजकधा अधिनियमांतर्गत अतिरिक्त मोकळी जमीन आहे किंवा कसे याची प्रथमतः संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांकडून खातरजमा करुन घ्यावी. सक्षम प्राधिकाऱ्यांनीही त्याबाबत १५ दिवसांत माहिती उपलब्ध करुन द्यावी. आणि सदर जमीन अतिरिक्त ठरत असल्यास अशा प्रकरणामध्ये शासनाची पूर्व परवानगी घेणे संबंधित प्राधिकरणावर बंधनकारक राहिल. यापुढे अशाप्रकारे शासनाची पूर्व परवानगी न घेता एस.आर.ए. योजना मंजूर केल्यास त्याबाबत संबंधित प्राधिकरणावर जबाबदारी निश्चित करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

आपला,

( श्याम वर्धने )
सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित-**

**अतिरिक्त जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, नाजकधा, बृहन्मुंबई/ठाणे.**

**उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, नाजकधा, उल्हासनगर.**

Scanned with CamScanner